# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २९५ - २३** **दिनांक : - ०२/०९/२०२३**

**घरफोडी चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.**

पेल्हार पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दि. १९/०८/२०२३ रोजी दुपारी ०४.०० ते दि.२०/०८/२०२३ रोजी ०७.०० वा. च्या दरम्यान फिर्यादी श्री. विष्णु अर्जुन जाधव वय ६३ वर्षे, यांच्या बंद गाळयाचे शटर कोणीतरी अज्ञात चोरटयाने कशाच्यातरी सहाय्याने उचकटुन त्यावाटे आत प्रवेश करुन फिर्यादी यांच्या गाळयातुन २०,१५०/- रुपये किंमतीचे ६५ किलो वजनाचे तांबे चोरी करुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. I ७९१/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ अन्वये दिनांक २५/०८/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ सदर गुन्हयाचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहीती व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे सदर गुन्हयातील आरोपी नामे - राहुल शिवबच्चन गुप्ता वय-२४ वर्ष रा. नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास केला असता वर नमुद गुन्हायात सहभाग निष्पन्न झाल्याने सदर गुन्हात आरोपीत यास अटक करुन त्याचेकडुन १७,३६०/- रुपये किंमतीचे ५६ किलो तांबे हस्तगत करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. विजय पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, स.पो.नि.सोपान पाटील, पो.हवा.गेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अं.रवि वानखेडे, संजय मासाळ, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, सुजय पाटील, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**----0000----**